




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25









वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ११५ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार । १४/०५/२०२६ । पाने - ६







# प्रवरा नदी परिसरात मद्यधुंद तरुणांचा धिंगाणा

## महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर


एआय फोटो

**युवावार्ता (प्रतिनिधी)**

**संगमनेर** - शहरातील प्रवरा नदी परिसरात काही मद्यधुंद तरुणांकडून सुरू असलेल्या गैरप्रकारांमुळे नागरिकांमध्ये तीव्र भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळेत नदीकाठी फिरण्यासाठी, आंघोळीसाठी किंवा कुटुंबासह विरंगुळ्यासाठी येणाऱ्या महिला, युवती आणि नागरिकांना या प्रकारांचा मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील विविध भागांतील काही तरुण दररोज सायंकाळी पाचनंतर प्रवरा नदी परिसरात मोठ्या संख्येने जमा होत असून, तेथे खुलेआम मद्यपान केले जात आहे. मद्यधुंद अवस्थेत हे तरुण मोठमोठ्याने आरडाओरडा करणे, अश्लील भाषेचा वापर करणे, शिवीगाळ करणे तसेच धिंगाणा घालून परिसरातील शांतता भंग करत असल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे नदी परिसरात निर्माण होणारे वातावरण दिवसेंदिवस बिघडत चालल्याची खंत स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, नदी परिसरात आलेल्या मुली व महिलांकडे पाहून अश्लील टिप्पणी करणे, छेडछाड करण्याचा प्रयत्न करणे असे प्रकारही वाढल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून अनेक कुटुंबांनी सायंकाळच्या वेळेत नदी परिसरात जाणे टाळण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, काही सजग नागरिकांनी या प्रकारांना विरोध करत संबंधित तरुणांना समज देण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याशी हुज्जत घालण्यात आली. काहींना मारहाणीच्या धमक्या देण्यात आल्याचाही आरोप समोर आला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. स्थानिक नागरिकांनी पोलीस प्रशासन तसेच नगरपरिषदेच्या रक्षक दलाने या प्रकाराची तातडीने दखल घ्यावी, प्रवरा नदी परिसरात नियमित पोलीस गस्त सुरू करावी, मद्यपान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच महिला व नागरिकांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करावे, अशी जोरदार मागणी केली आहे. नदी परिसर हा नागरिकांच्या विरंगुळ्याचा आणि सामाजिक संवादाचा महत्त्वाचा भाग मानला जातो. मात्र वाढत्या गैरप्रकारांमुळे या परिसराची प्रतिमा मलिन होत असून वेळेत कारवाई न झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# विद्यार्थी-तरुणांच्या हितासाठी तामिळनाडू सरकारचा मोठा निर्णय

## ७१७ दारू दुकाने बंद, महाराष्ट्राला कधी जमणार ?

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

विजय थलपती यांच्या नेतृत्वाखालील तामिळनाडू सरकारने राज्यातील विद्यार्थी, तरुण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील प्रार्थनास्थळे, शैक्षणिक संस्था आणि बसस्थानकांच्या ५०० मीटर परिसरात असलेली तब्बल ७१७ सरकारी 'टास्मॅक' दारू विक्रीची दुकाने पुढील दोन आठवड्यांत बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

• मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर विजय यांनी संवेदनशील भागांतील दारू दुकानांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले होते. त्यानुसार राज्यातील ४,७६५ 'टास्मॅक' दुकानांपैकी २७६ दुकाने धार्मिक स्थळांजवळ, १८६ शैक्षणिक संस्थांजवळ तर २५५ दुकाने बसस्थानकांच्या परिसरात असल्याचे आढळून आले. सार्वजनिक हित, विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि सामाजिक वातावरण लक्षात घेऊन ही दुकाने बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. 'टास्मॅक' ही तमिळनाडू सरकारसाठी मोठ्या महसुलाचा स्रोत मानली जात असली तरी अनेक सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षांकडून गेल्या अनेक वर्षांपासून संवेदनशील भागांतील दारू दुकाने बंद करण्याची मागणी होत होती. दरम्यान, 'टास्मॅक'मधील कथित



आर्थिक गैरव्यवहारांप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाकडून चौकशी सुरू असल्याने हा निर्णय अधिक चर्चेत आला आहे. तमिलगा वेत्री कळघम पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात 'अमली पदार्थमुक्त तमिळनाडू'चे आश्वासन दिले होते. त्या दिशेने विजय सरकारने उचललेले हे पहिले मोठे पाऊल मानले जात आहे. विद्यार्थी व तरुणांच्या भवितव्यासाठी असा धाडसी निर्णय महाराष्ट्र सरकार कधी घेणार, असा प्रश्नही आता उपस्थित केला जात आहे. महाराष्ट्रात देखील शाळा महाविद्यालय परिसरात मोठ्या प्रमाणावर दारूचे दुकाने, पान टपऱ्या असतात. याबाबत केवळ घोषणा होतात मात्र कार्यवाही होत नाही. त्यामुळे भावी पिढी व्यसनाधीन होत आहे. जे तामिळनाडूच्या नवीन मुख्यमंत्र्यांना जमले ते पुढारलेल्या व पुरोगामी म्हटल्या जाणाऱ्या महाराष्ट्राला का जमू नये असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# भंडारदऱ्यात काजव्यांचा प्रकाशोत्सव

## बोहाडा आणि सांदनदरीने पर्यटक मंत्रमुग्ध


एआय फोटो

**युवावार्ता (प्रतिनिधी)**

**अकोले-** सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या भंडारदरा धरण परिसरात सध्या आदिवासी लोककला, निसर्गसौंदर्य आणि काजव्यांच्या प्रकाशोत्सवाची अनोखी पर्वणी अनुभवायला मिळत आहे. तालुक्यातील पाणलोट क्षेत्रातील गावांमध्ये पारंपरिक 'बोहाडा' उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून, सोमवारी पांजरे येथे बोहाड्याची रंगत पाहायला मिळाली. गुरुवारी घाटघर येथे हा पारंपरिक सोहळा रंगणार आहे.

मे महिन्याच्या अखेरीस पावसाची चाहूल लागताच, डोंगरदऱ्यांमध्ये बोहाड्याचे सूर घुमू लागतात. पाऊस व वाऱ्याचा अंदाज बदलला की आदिवासी बांधव पारंपरिक सोंगे, दशावतारी पात्रे आणि पौराणिक आखाड्यांच्या माध्यमातून निसर्गाची आराधना करतात. लोककलेची ही परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने जपली जात असल्याने पर्यटकांनाही या संस्कृतीचे मोठे आकर्षण वाटते.

दरम्यान, संध्याकाळी डोंगरदऱ्यांमध्ये अंधार पसरू लागताच हजारो-लाखो काजवे चमचमत प्रकाशोत्सव साकारतात. निरव शांततेत लुकलुकणाऱ्या या काजव्यांच्या रोषणाईने संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध होतो. काजव्यांचा हा नैसर्गिक उत्सव पाहण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत असून, सुट्टीचा आनंद घेण्यासाठी अनेक जण भंडारदरा परिसराकडे धाव घेत आहेत.

मान्सूनपूर्व काळात काजवा उत्सवाबरोबरच साम्रद येथील गूढरम्य सांदन दरी पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरत आहे. रतनगड आणि घोड्याचे पाऊल या डोंगररांगांदरम्यान वसलेली सांदन दरी आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाची व्हॅली म्हणून ओळखली जाते. थरारक दरीचे टोक गाठण्यासाठी पर्यटकांची झुंबड उडत असून, काजवा उत्सवासोबत सांदन दरीची सफर पर्यटकांच्या आनंदात भर घालत आहे.

मात्र, वाढती पर्यटकांची रेलचेल काजव्यांच्या अस्तित्वासाठी धोकादायक ठरू लागल्याची चिंता पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. निसर्गाचा आनंद घेताना पर्यावरणाचे भान राखणे आवश्यक आहे, असे पर्यावरण अभ्यासक रवि ठोंबाडे यांनी सांगितले. काजवे आणि सांदन दरी पाहताना पर्यटकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहनही करण्यात येत आहे.

# NEET पेपरफुटीचे धागेदोरे अहिल्यानगरपर्यंत

## सीबीआयची कारवाई, आणखी एक संशयित आरोपी जेरबंद

**युवावार्ता (प्रतिनिधी)**

**अहिल्यानगर** - देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट २०२६' पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता थेट अहिल्यानगरपर्यंत पोहोचले असून, केंद्रीय अन्वेषण विभागाने आज सकाळी शहरात धाडसी छापेमारी करत आणखी एका संशयित आरोपीला अटक केली आहे. धनंजय लोखंडे असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव असून, पुण्यातून फरार झाल्यानंतर तो अहिल्यानगरमध्ये लपून बसल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली होती. गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.


एआय फोटो

या कारवाईमुळे महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून या बहुचर्चित पेपरफुटी प्रकरणात महाराष्ट्रातून झालेली ही दुसरी मोठी अटक मानली जात आहे. धनंजय लोखंडे याची सध्या कसून चौकशी सुरू असून या रॅकेटचे धागेदोरे नेमके किती दूरपर्यंत गेले आहेत याचा तपास सीबीआय आणि विशेष तपास पथकाकडून केला जात आहे.

तपासादरम्यान धनंजय लोखंडेचे शेवटचे लोकेशन पुण्यात आढळून आले होते. मात्र, पोलिसांच्या हालचालींची चाहूल लागताच त्याने तिथून पलायन केले. त्यानंतर तो अहिल्यानगरमध्ये आश्रयाला आल्याची माहिती मिळाल्यानंतर सीबीआय, विशेष तपास पथक आणि स्थानिक पोलिसांनी संयुक्त कारवाई करत त्याला अटक केली. लवकरच त्याला मुख्य तपास यंत्रणेच्या ताब्यात देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

३ मे रोजी घेण्यात आलेल्या नीट परीक्षेचा पेपर फुटल्याचे स्पष्ट झाल्यानंतर नॅशनल टेस्टिंग एजन्सीने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. (पान २)

### २२ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य अधांतरी

**या पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरातील तब्बल २२ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. परीक्षा रद्द झाल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. एनटीएने नव्याने परीक्षा घेण्याचे संकेत दिले असून, नवीन तारखा लवकरच जाहीर केल्या जाणार असल्याचे सांगितले आहे.**










# पटेल, तटकरेंसह 22 आमदार भाजपतून लढणार- रोहित पवार



**मुंबई (वृत्तसंस्था)**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे व ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांच्यासह राष्ट्रवादीचे तब्बल २२ आमदार भाजपतून लढणार असल्याचा दावा विरोधी बाकावरील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राज्याच्या राजकारणात खळबळ माजली असून, या आमदारांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, सुनील तटकरे व सुनील शेळके यांनीही या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. एनसीपीच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतून तटकरे व प्रफुल्ल पटेल यांची कथितपणे हकालपट्टी केल्यानंतर तटकरेंनी ही भेट घेतल्यामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळे तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी उपरोक्त दावा केला आहे. तसेच सुनेत्रा पवारांनी या प्रकरणी दिलेल्या स्पष्टीकरणावरही निशाणा साधला आहे.

रोहित पवार आज सकाळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, सुनेत्रा पवारांनी केलेली कारवाई स्वगात करण्यासारखीच होती. तो एक धाडसी निर्णय होता. धाडसी निर्णय घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. पण धाडसी निर्णय घेतल्यानंतर लगेचच त्याला आपण वेगळे ट्विट करून हो, नाही करणे करणे हा त्या पक्षाचा विषय असला तरी अवघड आहे. हा निर्णय अजित पवारांनी घेतला असता तर त्यांनी तो बदलला नसता. समजा आम्ही त्या ठिकाणी असलो असतो, माझ्यासारखा एखादा कार्यकर्ता असता तर आम्हीही आपला निर्णय बदलला नसता. त्यामुळे निर्णय बदलण्यातून त्या पक्षात अनेक नेते असल्याचा संदेश जातो. यासह पद काय दिले काय दिले नाही हे वैयक्तिक पातळीवर संबंधितांना काय वाटते हा त्यांचा मुद्दा आहे. तो त्यांना लखलाभ.

# खरात प्रकरणात रुपाली चाकणकरांना ईडीचे समन्स



**युवावार्ता नाशिक (प्रतिनिधी)**

राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा आणि भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या रुपाली चाकणकर यांच्या संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. भोंदू अशोक खरात प्रकरणात एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुतेंनी रुपाली चाकणकरांची तब्बल ६ तास चौकशी केली होती. त्या चौकशीनंतर आता मोठी घडामोड घडत असून ईडीकडून रुपाली चाकणकर यांना समन्स बजावण्यात आला आहे. भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांना समन्स बजावला असून ईडीने याच आठवड्यात चाकणकर यांना चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे.

अशोक खरात प्रकरणातील आर्थिक व्यवहार आणि मनी लॉन्ड्रिंगच्या अनुषंगाने ईडीकडून चौकशी करण्यात आली असल्याची माहिती आहे. याआधीही ईडीने या प्रकरणात रुपाली चाकणकर यांच्या बहिणीची चौकशी केली होती. दरम्यान, अशोक खरात प्रकरणात ईडीकडून विविध व्यक्तींची चौकशी सुरू असून, आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी केली जात आहे. अशातच एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुतेंनी रुपाली चाकणकरांची तब्बल ६ तास चौकशी केली होती. त्यानंतर पुन्हा एकदा रुपाली चाकणकरांना चौकशीच्या ससेमिऱ्याला समोर जावं लागणार आहे.

# बारामतीत पुन्हा विमान दुर्घटना

## मोठी जीवितहानी टळली



**पुणे (वृत्तसंस्था)**


बारामती तालुक्यातील गोजुबावी गावाजवळ आज सकाळी प्रशिक्षणासाठी वापरले जाणारे एक विमान कोसळल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. सकाळी सुमारे ८.५० वाजण्याच्या सुमारास रेडबर्ड एव्हिएशन कंपनीचे प्रशिक्षण विमान विमानतळालगतच्या परिसरात क्रॅश लँडिंग झाल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. विमान अचानक खाली येताना पाहून काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, हे विमान कमी उंचीवरून उड्डाण करत होते. त्यावेळी विमानामध्ये तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. नियंत्रण सुटल्यामुळे विमानाने आपत्कालीन लँडिंगचा प्रयत्न केला. मात्र खाली येत असताना विमानाचा एक भाग रस्त्यालगतच्या वीज खांबाला धडकला आणि त्यानंतर विमान जमिनीवर आदळले. या धडकेमुळे परिसरात मोठा आवाज झाला. घटनेनंतर नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली.

या विमानात त्या वेळी केवळ प्रशिक्षण घेणारा वैमानिक उपस्थित होता. सुदैवाने या दुर्घटनेत त्याला कोणतीही गंभीर दुखापत झालेली नाही. वैमानिक सुरक्षित असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि संबंधित यंत्रणांचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. परिसराची पाहणी करून पंचनामा आणि चौकशीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून विमान कोसळण्यामागील नेमके कारण शोधले जात आहे.

# उकाड्यापासून सुटका होणार

## मान्सून अंदमानात धडकणार



मुंबई - उष्णतेच्या लाटेने होरपळणाऱ्या नागरिकांसाठी अतिशय महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या ताज्या अंदाजानुसार, यंदा मान्सून लवकर दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. नैऋत्य मान्सूनसाठी आता अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असून मे महिन्याच्या या आठवड्याच्या अखेरीस मान्सून अंदमानात दाखल होण्याची दाट शक्यता आहे. केरळमध्ये मान्सून दाखल झाल्यानंतर महाराष्ट्रातही प्रभाव जाणवतात, त्यामुळे उकाड्याने हैराण झालेले नागरिक आता पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

भारतीय हवामान विभागाने विभागाने मंगळवारी दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण बंगालचा उपसागर, अंदमान समुद्र आणि अंदमान निकोबार बेटांच्या परिसरात मान्सूनसाठी अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे. सामान्यतः मान्सून २० मेच्या सुमारास अंदमानात दाखल होतो. पण यंदाची स्थिती पाहता, पाऊस नेहमीच्या वेळेपेक्षा ५ ते ६ दिवस आधीच अंदमानात धडक देऊ शकतो. यामुळे यंदा मुख्य भूभागावरही मान्सून वेळेवर किंवा लवकर पोहोचण्याची आशा निर्माण झाली आहे.

अंदमानात मान्सून दाखल होत असतानाच दक्षिण भारतातही पावसाचा अंदाज वर्तवला जातो. पुढील चार ते पाच दिवस दक्षिण भारतातील तामिळनाडू, केरळ, कर्नाटक या राज्यांमध्ये पुढील चार ते पाच दिवस पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# आयात शुल्कवाढीने सोने, चांदीत ऐतिहासिक उसळी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

केंद्र सरकारनं सोनं आणि चांदीच्या आयात शुल्कात वाढ केल्यानं आज कमोडिटी बाजार आणि सराफा बाजारात मोठी खळबळ उडाली आहे. या निर्णयामुळे सोन्या- चांदीच्या किमतीत ऐतिहासिक वाढ झाली असून एमसीएक्सवर सोन्याचा भाव १०,००० रुपयांनी तर चांदी १८,००० रुपयांहून अधिक महागली आहे.एमसीएक्सवरील स्थिती पाहता ५ जूनच्या डिलिव्हरीसाठीचं सोनं मागील सत्रात १,५३,४४२ रुपयांवर बंद झालं होतं. आज ते १,५४,८५१ रुपयांवर उघडलं आणि काही वेळातच १०,००२ रुपयांच्या मोठ्या वाढीसह १,६३,४४४ रुपयांवर पोहोचलं.

याचप्रमाणे चांदीच्या किमतीतही मोठी झेप पाहायला मिळाली आहे. ३ जुलैच्या डिलिव्हरीसाठीच्या चांदीचा भाव मागील सत्रात २,७९,०६२ रुपयांवर बंद झाला होता, जो आज २,९०,२२४ रुपयांवर उघडला आणि १८,५४० रुपयांच्या वाढीसह २,९७,६०२ रुपये प्रति किलोवर पोहोचला. विशेष म्हणजे ४ सप्टेंबरच्या डिलिव्हरीसाठीच्या चांदीनं १८,६५७ रुपयांची वाढ नोंदवत ३,०३,२५० रुपयांचा टप्पा गाठला आहे.सराफा बाजारातील स्थिती काय?सराफा बाजारात मात्र सोन्याच्या किमतीत किरकोळ वाढ दिसून आली आहे. गुड रिटर्न्सच्या माहितीनुसार २४ कॅरेट सोन्याची किंमत १० रुपयांच्या वाढीसह १,५३,९९० रुपये प्रति १० ग्रॅमवर व्यवहार करत आहे. २२ कॅरेट सोनं देखील १० रुपयांच्या वाढीसह १,४१,१६० रुपयांवर पोहोचलं असून १८ कॅरेट सोन्याचा दर १० रुपयांनी वाढून १,१५,५०० रुपयांवर गेला आहे. चांदीच्या किमतीत १००० रुपयांची वाढ होऊन ती २,९०,००० रुपये प्रति किलोवर पोहोचली आहे. सरकारनं आयात शुल्कात केलेल्या बदलांमुळे सोन्या-चांदीच्या आयातीवर परिणाम झाला असून त्याचे थेट पडसाद आजच्या बाजारभावात उमटलेले दिसत आहेत.

# NEET पेपरफुटीचे धागेदोरे...

**पान १ वरून** - तपासात समोर आलेल्या धक्कादायक माहितीनुसार, परीक्षेच्या तब्बल एक महिना आधी राजस्थानमधील सिकर या प्रसिद्ध कोचिंग हबमध्ये हा पेपर पोहोचल्याचे उघड झाले आहे. याचबरोबर परीक्षेच्या आदल्या रात्री तब्बल ७ लाख ३० हजार रुपयांना विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका विकली गेल्याचा गंभीर आरोपही समोर आला आहे. विशेष म्हणजे, कथित 'गेस पेपर'मधील रसायनशास्त्राचे १२० प्रश्न आणि जीवशास्त्रातील अनेक प्रश्न मूळ प्रश्नपत्रिकेशी तंतोतंत जुळल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या रॅकेटची व्याप्ती अधिकच गंभीर असल्याचे स्पष्ट होत आहे. या प्रकरणाचा तपास आता महाराष्ट्र, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या तीन राज्यांत वेगाने सुरू आहे. जयपूरमधून या रॅकेटचा कथित 'मास्टरमाइंड' मनिष यादव याला यापूर्वीच अटक करण्यात आली आहे. तसेच नाशिकमधून डॉ. शुभम मधुकर खैरनार यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले होते. धनंजय लोखंडे हा शुभम खैरनारचा जवळचा मित्र असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, या दोघांमधील नेमके संबंध काय आणि रॅकेटमध्ये त्यांची भूमिका किती मोठी होती, याबाबत तपास यंत्रणांनी अद्याप अधिकृत माहिती दिलेली नाही. या संपूर्ण प्रकरणात काही नामांकित कोचिंग क्लासेसचे संचालक, एजंट आणि मध्यस्थ सहभागी असण्याचीही दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, राजस्थानमधील स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप (डजऋ) आणि सीबीआयसह विविध तपास यंत्रणा अनेक ठिकाणी छापेमारी करत आहेत. महाराष्ट्रातील ताज्या अटकेमुळे या आंतरराज्यीय पेपरफुटी रॅकेटचा मोठा पर्दाफाश होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# खरातच्या पत्नीचा पाय खोलात

## अटकपूर्व जामिनावरील सुनावणी लांबली



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - शहरातील बहुचर्चित अशोक खरात प्रकरणाने पुन्हा सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. अशोक खरातची पत्नी कल्पना खरात यांच्या वतीने न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावर आज सुनावणी झाली, मात्र न्यायालयाने त्यांना कोणताही तात्काळ दिलासा देण्यास नकार दिला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता मे महिन्याच्या अखेरीस ढकलण्यात आली आहे.

कल्पना खरात यांनी अटकेच्या भीतीने छत्रपती संभाजीनगर येथील न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने आजच्या सुनावणीत खरात यांना दिलासा देण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिला. या प्रकरणाची पुढील सुनावणी २५ ते ३० मे दरम्यान होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. तोपर्यंत कल्पना खरात यांच्यावर अटकेची टांगती तलवार कायम राहणार आहे.

सुनावणी दरम्यान, खरात यांच्या वकिलांनी न्यायालयाचे लक्ष वेधण्यासाठी काही जुन्या निकालांचे संदर्भ देण्याचा प्रयत्न केला. कायदेशीर पळवाटा आणि पूर्वीच्या काही सारख्या प्रकरणांमधील न्यायालयाच्या निर्णयांचा आधार घेत जामीन मिळवण्यासाठी जोरदार युक्तिवाद करण्यात आला. परंतु, न्यायालयाने हे संदर्भ ग्राह्य धरले नाहीत आणि तूर्तास जामीन अर्जावरील पुढील प्रक्रिया स्थगित ठेवली.दरम्यान, रुपाली चाकणकर देखील अशोक खरात प्रकरणात अडकल्या आहेत. चाकणकर यांची दोन दिवसांपूर्वीच विशेष तपास पथकाद्वारे साडेपाच तास चौकशी करण्यात आली होती. आता या प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने उडी घेतली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ईडीने रुपाली चाकणकर यांना समन्स बजावले असून लवकरच त्यांची चौकशी केली जाणार आहे. महिलांवरील लैंगिक अत्याचारासोबत अशोक खरात याने एक मोठे खंडणी रॅकेट चालवल्याचा आरोप आहे. या रॅकेटच्या माध्यमातून त्याने ७० कोटी रुपयांहून अधिक रक्कम गोळा केल्याचा संशय आहे. ही मोठी रक्कम वळवण्यासाठी त्याने अनेक बेनामी बँक खाती वापरली होती.

# भरदुपारी सहा लाखांची पिशवी चोराने पळवली

**युवावार्ता (प्रतिनिधी)**

**संगमनेर** - अज्ञात चोरट्याने सहा लाख ७० हजार रुपये ठेवलेली पैशाची पिशवी पळवून नेल्याची घटना काल सोमवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास तालुक्यातील घुलेवाडी परिसरात घडली. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, विलास रघुनाथ बोराडे रा.साईश्रध्दा चौक श्रीस्वामी समर्थ नगर हे घुलेवाडी येथील शितल मार्केट मधील धान्य व प्लायवुड दुकानात मॅनेजर म्हणुन काम करत आहे. सोमवारी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास बोराडे हे दुकान मालक प्रफुल्ल राजमल बोगावत यांच्यासोबत घुलेवाडी येथे

अमृतवाहिनी बँकेत वेगवेगळ्या मोटार सायकलवर पैसे काढण्याकरिता गेले होते. बोगावत यांनी अमृतवाहिनी बँकेतुन ३ लाख रुपये काढुन व त्यांचे जवळ असलेले ३ लाख रुपये रक्कम असे एकूण ६ लाख रुपये व दुकानात जमा झालेले ७० हजार रुपये असे एकूण ६ लाख ७० हजार रुपये मर्चन्ट बँक घुलेवाडी येथे जमा करण्यासाठी ताब्यात घेतले होते.

दरम्यान दुपारी चार वाजण्याच्या सुमारास तेथुन ६ लाख ७० हजार रुपये निळ्या रंगाचे पिशवीमध्ये हातात घेवुन शितल मार्केट येथे दुकानाच्या पायऱ्या चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या हातातील पैश्याची पिशवी घेऊन पलायन केले.

# मंत्र्यांच्या वाहनांना कात्री लागणार ?



**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुंबई पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या 'काटकसरी'च्या आवाहनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय वाहनांची संख्या कमी करण्यासाठी विविध विभागाच्या वतीन वापरण्यात येणाऱ्या वाहनांचा अहवाल राज्याच्या मुख्य सचिवांनी मागविला आहे. मंत्री, राज्यमंत्री, उच्च अधिकाऱ्यांच्या अतिरिक्त वाहनांवर या 'आवाहनाने' कात्री लागणार आहे.


पश्चिम आशियातील तणाव आणि इंधन आयात खर्चामुळे संभाव्य कठीण आर्थिक स्थितीचा सामना करण्यासाठी मोदी यांनी काटकसरीच्या उपाययोजना सुचविल्या आहेत. त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करता येईल याची चाचपणी सरकार पातळीवर सुरु आहे. वाहनांचा वापर कमी करा, असे जनतेला सांगण्यापूर्वी शासकीय वाहनांचा वापर कमी करण्याचे आवाहन सरकारपुढे आहे. त्याची सुरुवात मंत्री, राज्यमंत्री आणि उच्च अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वाहन सुविद्यांपासून केली जाणार आहे.

राज्यात एकूण ४२ मंत्री आहेत. यात ३३ कॅबिनेट व ६ राज्यमंत्री आहेत. या मंत्र्यांच्या मागे पुढे अनेक वाहनांचा ताफा असतो. तो कमी करण्यासंदर्भात विचारविनिमय केला जात आहे. मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री वगळता ही कात्री सर्व मंत्री, राज्यमंत्र्यांच्या ताफ्यावर लागणार आहे. राज्यात हजारो उच्च अधिकारी आहेत. त्यांना अतिरिक्त वाहन सुविद्या दिली जाते. ही वाहन संख्या कमी केल्यास काय परिणाम होतील याची चाचपणी केली जाणार आहे. मंत्री आणि मंत्रालयातील उच्च अधिकाऱ्यांबरोबरच राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे, प्राधिकरणे वापरत असलेल्या अतिरिक्त वाहनांचा अहवाल मागविला जाणार असल्याचे समजते. त्यांच्या वाहनांवरही वाहन कपातीची कात्री लागणार आहे.

# दिल्लीत १४ आणि १५ मे रोजी ब्रिक्स शिखर परिषद

नवी दिल्ली - पश्चिम आशियातील युद्ध, युक्रेन संघर्ष आणि ढासळत्या जागतिक अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर, भारताच्या यजमानपदाखाली 'ब्रिक्स' देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची एक अत्यंत महत्त्वाची बैठक १४ आणि १५ मे रोजी नवी दिल्लीत पार पडणार आहे. जागतिक व्यवस्थेत मोठे बदल होत असताना होणारी ही बैठक राजनैतिक दृष्टिकोनातून अत्यंत कळीची मानली जात आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने मंगळवारी या बैठकीची अधिकृत घोषणा केली. भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर या बैठकीचे अध्यक्षपद भूषवतील. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी सांगितले की, ब्रिक्सचे सदस्य देश आणि भागीदार देशांचे प्रतिनिधी या दोन दिवसीय कार्यक्रमात सहभागी होतील.पहिल्या दिवशी (१४ मे) भारत मंडपम येथे होणाऱ्या सत्रात जगभरातील ज्वलंत प्रश्न आणि प्रादेशिक सुरक्षेवर चर्चा होईल. दुसऱ्या दिवशी (१५ मे) बिल्डिंग फॉर रेझिलिअन्स, इनोव्हेशन, कोऑपरेशन अँड सस्टेनेबिलिटी या संकल्पनेवर आधारित विशेष सत्र होईल. यात ब्रिक्सच्या गेल्या २० वर्षांतील वाटचालीचा आढावा आणि भविष्यातील धोरणे ठरवली जातील. जागतिक प्रशासन आणि बहुपक्षीय प्रणालींमध्ये सुधारणा करण्यावरही या बैठकीत भर दिला जाणार आहे.पंतप्रधान मोदींशी संवाद : या बैठकीसाठी येणारे पाहुणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. 'सेवा तीर्थ' येथे पंतप्रधानांसोबत परराष्ट्र मंत्र्यांचा संयुक्त संवाद होईल. तसेच, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पाहुण्यांसाठी विशेष मेजवानीचे आयोजन केले आहे.

# अल्पसंख्यांक शाळांसाठी टीईटी सक्ती नाही : उच्च न्यायालय



**मुंबई (वृत्तसंस्था)**

अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांना 'शिक्षक पात्रता परीक्षा' अनिवार्य नसल्याचा पुनरुच्चार मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद ) खंडपीठाने केला आहे. वारंवार स्पष्ट आदेश देऊनही 'टीईटी'च्या नावाखाली शिक्षकांचे नियुक्ती प्रस्ताव फेटाळणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर न्यायालयाने तीव्र संताप व्यक्त केला. तरपुन्हा अशी चूक केल्यास कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल असे शिक्षणाधिकाऱ्यांना बजावले आहे.

सय्यद अबू झैद सय्यद रफिक, सायली व्यंकटेश गायकवाड आणि साईनाथ गणपत बनसोडे या शिक्षकांच्या 'शिक्षण सेवक' पदाच्या नियुक्तीला शिक्षणाधिकाऱ्यांनी मान्यता नाकारली होती. या शिक्षकांनी टीईटी परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही असे कारण शिक्षण विभागाने दिले होते. या निर्णयाविरोधात शिक्षकांनी औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली होती. सुनावणीअंती न्यायालयाने शिक्षणाधिकाऱ्यांचे जुने आदेश रद्द केले. संबंधित संस्थांना १५ दिवसांच्या आत पुन्हा प्रस्ताव सादर करण्यास सांगितले. हे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत टीईटी पात्रतेचा आग्रह न धरता एका महिन्याच्या आत मान्यता देण्याचे सक्त आदेश न्यायालयाने दिले आहेत. ॲड. सय्यद तौसिफ यासीन, ॲड. शेख तारेक मोबिन एच. आणि ॲड. के. पी. रोडगे यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तीवाद केला.न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती अजित बी. कडेठाणकर यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी घेतली. सुनावणी दरम्यान न्यायालयाने शिक्षण विभागाच्या कारभारावर ताशेरे ओढले.

न्यायालय वारंवार स्पष्ट आदेश देत असतानाही शिक्षणाधिकारी जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करून चुकीचे आदेश काढत आहेत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

न्यायालयात हजर झाल्यानंतर अधिकारी अशा प्रकरणात बिनशर्त माफी मागतात. मात्र त्यानंतर पुन्हा त्याच चुका करतात. यावेळी न्यायालयाने त्यांना केवळ इशारा देऊन सोडले, मात्र भविष्यात अशा चुका झाल्यास थेट कारवाईचे संकेत दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने 'अंजुमन इसाअत-ए-तालीम ट्रस्ट' प्रकरणात हा मुद्दा मोठ्या खंडपीठाकडे सोपवला असल्याने, तोपर्यंत शिक्षणाधिकारी टीईटीचा आग्रह धरू शकत नाहीत. तसेच १७ ऑक्टोबर २०२५ च्या शासकीय परिपत्रकानुसार अल्पसंख्याक शाळांना आरटीई (ठढए) लागू नसल्याने टीईटीची अट नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.














Happy Birthday



मा. श्री. मयूर पवार
संचालक, मयूर ऑटो वर्ल्ड



मा. इंजि. अमित गुंजाळ
संचालक, गुंजाळ कन्स्ट्रक्शन




मा. श्री. मोहित मंडलीक
संचालक, मोहित कॉम्प्युटर्स



मा. श्री. अनिल थोरात
मॅनेजर, शेतकी संघ, संगमनेर



ॲड. बाळासाहेब राऊत
अध्यक्ष, मथुराबाई भाऊसाहेब थोरात विद्यालय, घुलेवाडी



मा. श्री. श्रीकांत कोकणे
एलआयसी एजंट

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

Daily Yuvavarta

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता


# एआयएमआयएम नगरसेवकाच्या घरावर महानगरपालिकेचा बुलडोझर



छ. संभाजीनगर (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगरमध्ये एआयएमआयएम नगरसेवक मतीन पटेल यांचे घर आणि कार्यालय बुधवारी सकाळी बुलडोझरने पाडण्यात आले. ही कारवाई महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामाच्या प्रकरणात केली आहे.

पोलिसांनुसार, आरोपी निदा खानला ७ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली होती. मतीन पटेलने तिला आपल्या घरात आश्रय दिला होता, असा दावा करण्यात आला. यानंतर ९ मे रोजी महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामाबाबत नोटीस बजावली होती आणि ७२ तासांत उत्तर मागितले होते.

दरम्यान, या प्रकरणावर महाराष्ट्राचे मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, एकीकडे पटेल आणि त्यांचे लोक घर आपले नसल्याचे सांगत होते, तर दुसरीकडे महानगरपालिकेच्या नोटिशीविरोधात न्यायालयात जाण्याची भाषा करत होते. हे दुहेरी मापदंड आहे. निदा खान केवळ एक 'पेड वर्कर' होती. या धर्मांतर रॅकेटमध्ये एखाद्या राजकीय पक्षाची भूमिका असू शकते.

# विठोबाचे नाम नुच्चारी जे तोंड। प्रत्यक्ष ते कुंड चर्मकांचे। - संत तुकाराम महाराज

जया नाही नेम एकादशी व्रत ।
जाणावे ते प्रेत सर्व लोकी ।।१।।
त्याचे वय नित्य काळ लेखीताहे ।
रागे दात खाय करा करा ।।२।।
जयाचिये द्वारी तुळशी वृंदावन ।
नाही ते स्मशान गृह जाणा ।।३।।
जया कुळी नाही एक ही वैष्णव ।
त्याचा बुडे भवनदी तापा ।।४।।
विठोबाचे नाम नुच्चारी जे तोंड ।
प्रत्यक्ष ते कुंड चर्मकाचे ।। ५ ।।
तुका म्हणे त्याचे काष्ट हातपाय ।
कीर्तना नव जाय हरीचिया ।।६।।

युवावार्ता (सदाशिव मुळे)

संगमनेर शहराच्या जनता नगरमध्ये सुरू असलेल्या ह.भ.प. बाळकृष्ण महाराज कर्पे यांचे नेतृत्व प्रेरणेने ३८ वा अखंड हरिनाम सप्ताह किर्तन महोत्सव सोहळ्यात कीर्तन रुपी सहावे पुष्प गुंफतांना हिंजवडी, पुणे येथील ह. भ. प. शेखर महाराज जांभुळकर यांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा एकादशी व्रत, तुळशी वृंदावन व विठोबाचे नाम जपाचे महत्व विशद करणारा अभंग सेवेसाठी घेतला होता. अभंगाचा मतितार्थ असा की, जो नेम धर्म एकादशी व्रत पाळीत नाही तो प्रेतासमान समजला जावा. काळ ही ज्याच्यावर रागावून करा करा दात खात असतो.ज्याच्या दारात तुळशी वृंदावन नाही ते घर स्मशानाप्रमाणे आहे. ज्याच्या कुळात एकही वैष्णव नाही त्याचे संपूर्ण कुळच भवनदीच्या नदीच्या त्रीविध तापात बुडते. ज्या मुखात विठ्ठलाचे नावच येत नाही ते चर्मकाराचे कुंड समजावे. तुकाराम महाराज म्हणतात जो हरी किर्तनाला जात नाही त्याचे हात पाय लाकडाप्रमाणे असतात असे मानावे. हा संत तुकाराम महाराजांचा अतिशय परखड आणि प्रसिद्ध अभंग आहे यात त्यांनी वैष्णव धर्माची कर्तव्य न पाळणाऱ्यावर कठोर शब्दात टीका केली आहे. हरिभक्त परायण शेखर महाराज जांभुळकर अभंगावर चिंतन करताना म्हणालेकी, संत तुकाराम महाराजांची गाथा, अभंग म्हणजे संवादिनी आहे ते देवासी, संतांशी, थोराशी व सर्वसामान्य व्यक्तींशी संवाद साधताना ज्याच्या त्याच्या अधिकार व पात्रतेनुसार उपदेश करतात. संत उपदेश करीत असताना, संत ज्ञानेश्वर माऊलींच्या म्हणजेच आईच्या भूमिकेतून प्रेमळ भाषा वापरतात. परंतु संत तुकाराम महाराज उपदेश करताना सर्व सामान्य लोक साधक व समाजात दुरावस्था येऊ नये म्हणून वेळप्रसंगी ते कठोर होऊन उपदेश करतात. कारण त्यांना माहीत आहे की लोक असे तसे ऐकणार नाहीत परंतु संतांचे उपदेश हितकारक आहेत. त्यात समाजाचे कल्याण आहे. ते समाजाला जागृत करतात. कधी तुकाराम महाराजांना एकांत वास आवडतो त्यावेळेस ते निसर्गाशी एकरूप होतात. स्वतःच्या मनाशी, संतांशी थोरांशी संवाद साधतात. राजकर्त्यांनी वारकरी संप्रदायाला जपले पाहिजे.संत तुकाराम महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी पाठविलेला नजरांणा नाकारून त्यांना विठ्ठल नामाचा उपदेश केला. शिवाजी महाराजही तुळशी माळ घालत होते हे प्रसारमाध्यमाने लोकांपर्यंत नेले पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. वारकरी संप्रदायाने भक्तीची सोपी पद्धत सांगितली आहे संतांनी जगाच्या उद्धारासाठी व कल्याणसाठी देह झिजवीला आहे.संतांनी दाखवलेला मार्गाने वाटचाल केली तर हा भवसागर पार करणे सोपे होईल त्यासाठी निष्काम भक्ती केली पाहिजे विठ्ठल नामाचा जप केला पाहिजे एकादशी व्रत केले पाहिजे. हिंदू समाजातील व्रत वैकल्य या मागील विज्ञानही त्यांनी विशद केले.




जनतानगर
३८अखंड हरीनाम सप्ताह
किर्तन महोत्सव सोहळा
जनतानगर, संगमनेर



आजचे हरिकिर्तन ह.भ.प. उमेश महाराज दशरथे
दि. १४/५/२०२६ काल्याचे किर्तन
वेळ सकाळी ९ ते ११ वा.
ह.भ.प. उमेश महाराज दशरथे


# आत्मा मालिक सेमीचे मिशन सेन्चुरी यशस्वी

कोपरगाव (युवावार्ता प्रतिनिधी)- कोकमठाण येथील आत्मा मालिक शैक्षणिक संकुलातील आत्मा मालिक सेमी इंग्लिश मीडियम गुरुकुलचे सर्व चारशे चोवीस विद्यार्थी दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. त्यातील तब्बल एकशे दहा विद्यार्थ्यांनी नव्वद टक्क्यांहून अधिक गुण मिळविले. अदिती हुले हिने ९८.४० टक्के गुण मिळवून विद्यालयात पहिला क्रमांक पटकावला. येथील शिक्षकांनी 'मिशन सेन्चुरी' हे अभियान नियोजनपूर्वक राबविले. लक्ष्य निश्चित करून यश मिळविले. त्याचा परिणाम म्हणून पन्नास टक्के विद्यार्थ्यांना नव्वद टक्क्यांहून अधिक गुण मिळाले, अशी माहिती प्राचार्य निरंजन डांगे यांनी दिली. ते म्हणाले, विशेष श्रेणीत ३३६, प्रथम श्रेणीत ७७, तर द्वितीय श्रेणीत ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. अदिती मनस्वी सोनावणे व उन्नती सात्रस यांनी ९७.२०, ओम वरघाने यांनी ९७.००, प्रांजल काळे यांनी ९६.६०, तर दर्शन शिंदे यांनी ९६.४० टक्के गुण मिळवून अनुक्रमे दुसरा ते पाचवा क्रमांक मिळविला. १८३ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुणांची कमाई केली. ८० विद्यार्थ्यांनी ७० टक्क्यांपेक्षा जास्त गुण पटकावले, तसेच ५१ विद्यार्थ्यांनी ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण संपादन केले.

विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे, विभाग प्रमुख सचिन डांगे, अनिल सोनवणे, बाळकृष्ण दौंड, रवींद्र देठे, मीना नरवडे, रमेश कालेकर, तसेच पर्यवेक्षक गणेश रासने, नयना आदमाने, सुनील पाटील, नितीन अनाप यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोरडे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्षे, मीरा पटेल यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

हे आत्मा मालिक पॅटर्नचे यश आहे. शंभर विद्यार्थी नव्वद टक्क्यांहून अधिक गुण संपादन करतील, हे लक्ष्य निश्चित करण्यात आले. ऑपरेशन सेन्चुरी अंतर्गत लक्ष्यप्राप्ती करण्यात आली. त्यासाठी जादा तयारी वर्ग, विशेष तयारी वर्ग, सुपर नाईट अभ्यासिका, सुवर्ण पहाट अभ्यासिका, स्मार्ट सण्डे उपक्रम, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, दीर्घ सुट्यांमध्ये विशेष तयारी शिबिरे आदी उपक्रम राबविण्यात आले, असे नंदकुमार सूर्यवंशी, अध्यक्ष, विश्वात्मक, जंगली महाराज आश्रम ट्रस्ट यांनी सांगितले.

# रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी ई-फार्मसीवर बंदी आणावी

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून बनावट, मुदत संपलेली किंवा निकृष्ट दर्जाची औषधे लोकांपर्यंत पोहोचण्याची भीती व्यक्त केली जात आहे. इंटरनेट किंवा मोबाइल ॲप्सद्वारे होणारी औषधांची विक्री पूर्णपणे बंद व्हावी. रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी केंद्र सरकारने ई-फार्मसीवर कठोर नियम किंवा बंदी आणावी, अशी मागणी ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स ॲण्ड ड्रगिस्ट्स असोसिएशनच्या



वतीने करण्यात आली. त्या अनुषंगाने २० मे रोजी देशव्यापी 'मेडिकल बंद' पुकारण्यात आला आहे.

संगमनेर तालुकाध्यक्ष केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष महेश अभंग, सचिव अजित येवले यांनी माहिती देताना सांगितले की, ई-फार्मसीवर बंदी म्हणजे इंटरनेटद्वारे होणारी औषध विक्री तातडीने बंद करावी. कठोर नियमावली लागू करत औषध विक्रीसाठी असलेल्या 'ड्रग्ज ॲण्ड कॉस्मेटिक्स ॲक्ट'चे

# मद्यधुंद शिक्षकाचा बेजबाबदारपणा

## १० वर्षांच्या मुलाच्या हाती कारचे स्टेअरिंग, अकोलेतील प्रकार

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)- समाजात 'गुरुजी' या शब्दाला नेहमीच आदर, संस्कार आणि जबाबदारीचे प्रतीक मानले जाते. विद्यार्थ्यांना शिस्त, नियम आणि सुरक्षिततेचे धडे देणाऱ्या शिक्षकांकडून समाज आदर्श वर्तनाची अपेक्षा ठेवतो. मात्र, अकोले तालुक्यात घडलेल्या एका धक्कादायक प्रकाराने या प्रतिष्ठित पदालाच काळिमा फासला आहे. स्वतः मद्यधुंद अवस्थेत असताना आपल्या अल्पवयीन मुलाच्या हाती भरधाव कारचे स्टेअरिंग देणाऱ्या एका शिक्षकाच्या बेजबाबदार कृत्यामुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकारामुळे मोठा अपघात घडून निष्पाप नागरिकांचा जीव जाऊ शकला असता, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (३ मे) अकोले तालुक्यातील गुरवझाप पीरसाईनगर येथील शिक्षक रामदास भांगरे हे आपल्या कुटुंबासह स्विफ्ट कार (एमएच ०२ बीजे ९३४७) मधून प्रवास करत होते. मात्र, प्रवासादरम्यान त्यांनी अत्यंत धोकादायक आणि कायद्याचे उल्लंघन करणारे कृत्य केल्याचा आरोप आहे. संबंधित शिक्षक हे मद्याच्या नशेत असल्याने त्यांनी स्वतः वाहन चालवण्याऐवजी अवघ्या १० ते ११ वर्षांच्या मुलाच्या हाती कारचे स्टेअरिंग दिले. अल्पवयीन मुलगा भरधाव वेगाने वाहन चालवत होता. रस्त्यावरून जाणाऱ्या इतर वाहनांना धोकादायक पद्धतीने कट मारत तो कार चालवत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

हा प्रकार नवलेवाडी फाट्याजवळील नागरिकांच्या लक्षात आला. वाहन चालवणारा मुलगा लहान असल्याचे दिसताच आणि कारचा वेग धोकादायक असल्याने उपस्थित नागरिकांनी तत्काळ हस्तक्षेप केला. निखिल रावसाहेब चौधरी व इतर प्रवाशांनी पथिक पेट्रोल पंप परिसरात संबंधित कार अडवून थांबवली. नागरिकांनी शिक्षक रामदास भांगरे यांना अल्पवयीन मुलाकडून वाहन चालवून घेणे हा गंभीर कायदेशीर गुन्हा असल्याचे सांगत समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, चूक मान्य करण्याऐवजी संबंधित शिक्षकांनी नागरिकांशीच हुज्जत घालत उद्धट व मगरुरीची भाषा वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे उपस्थित नागरिकांचा संताप अधिकच वाढला.

या संपूर्ण घटनेचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले असून, त्यात अल्पवयीन मुलगा कार चालवत असल्याचे स्पष्टपणे दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. तक्रारदार निखिल चौधरी यांनी या प्रकरणी पंचायत समिती अकोले येथील महिला व बालकल्याण विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीसोबत व्हिडिओ पुरावे तसेच फोन कॉल रेकॉर्डिंगही जोडण्यात आले असल्याचे समजते.

दरम्यान, या प्रकाराबाबत जाब विचारण्यात आल्याने बाळू खाडे नावाच्या अन्य एका शिक्षकाने तक्रारदाराला फोन करून दमदाटी केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे हे प्रकरण केवळ वाहतूक नियमभंगापुरते मर्यादित न राहता दबाव तंत्र वापरण्यापर्यंत पोहोचल्याची चर्चा सुरू झाली आहे. तक्रारदाराने आपल्या अर्जात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत कलम १२५ नुसार मानवी जीवितास धोका निर्माण करणे, कलम ३५१ (२) अंतर्गत धमकावणे, तसेच बाल न्याय अधिनियम २०१५ आणि मोटार वाहन कायद्यानुसार संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याशिवाय, शिक्षण विभागाने संबंधित शिक्षकावर तात्काळ शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच वाहन चालवणाऱ्या अल्पवयीन मुलाला बाल कल्याण समितीमार्फत समुपदेशनासाठी पाठवावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या घटनेमुळे अकोले तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांना नियम आणि संस्कार शिकवणारे शिक्षकच जर कायद्याचे उल्लंघन करून मद्यधुंद अवस्थेत असे बेजबाबदार कृत्य करत असतील, तर समाजाने आदर्श कोणाकडून घ्यावा? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. संबंधित शिक्षकाच्या निष्काळजीपणामुळे मोठी दुर्घटना घडू शकली असती, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. आता या गंभीर प्रकरणात पोलीस प्रशासन, महिला व बालकल्याण विभाग आणि शिक्षण विभाग नेमकी कोणती भूमिका घेतात, तसेच संबंधितांवर काय कारवाई होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# ज्ञानभारतम प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित संवर्धन मोहिमेला प्रारंभ

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)- भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित संवर्धन मोहिमेला १६ मार्च २०२५ पासून प्रारंभ करण्यात आला आहे. भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि बौद्धिक परंपरेचा अमूल्य ठेवा असलेल्या हस्तलिखितांचे जतन, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन आणि प्रसार करण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांकडे उपलब्ध असलेल्या प्राचीन हस्तलिखितांची माहिती ज्ञानभारतम मोबाईल ॲपवर अपलोड करून या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

भारतात विविध भाषा, लिपी आणि विषयांमध्ये तयार झालेली लाखो हस्तलिखिते विविध संस्था, ग्रंथालये, मठ, मंदिरे, संशोधन संस्था तसेच वैयक्तिक संग्राहकांकडे विखुरलेल्या स्वरूपात उपलब्ध आहेत. या सर्व हस्तलिखितांचा शोध घेऊन त्यांचे एकत्रीकरण करून राष्ट्रीय डिजिटल संग्रह तयार करण्याचा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. यामुळे देशातील मौल्यवान हस्तलिखित वारसा राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध होणार आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या उपक्रमामध्ये देशभरातील शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहकांचा सहभाग अपेक्षित आहे.

हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यमापन, पडताळणी आणि दस्तऐवजीकरणासाठी ज्ञानभारतम हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून, त्याद्वारे माहिती संकलनाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाची महत्त्वपूर्ण भूमिका असून, राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये आणि अभ्यासक यांचे सहकार्य घेण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य नोडल अधिकारी म्हणून पुराभिलेख संचालनालयाचे संचालक सुजितकुमार उगले हे कार्य पाहणार आहेत. तसेच, मराठी भाषा विभागाच्या उपसंचालक अंजली ढमाळ या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

महाराष्ट्र राज्यात या प्रकल्पासाठी काही संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत. त्यामध्ये कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे हे क्लस्टर केंद्र म्हणून, तर आनंद आश्रम संस्था, पुणे व भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे हे स्वतंत्र केंद्र म्हणून असणार आहेत. या उपक्रमामध्ये शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संशोधन संस्था, धार्मिक संस्था, स्वयंसेवी संघटना, एनसीसी, एनएसएस स्वयंसेवक, विद्यार्थी तसेच वारसा संवर्धन संस्था यांच्या सक्रिय सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे.

# संपादकीय...

## उष्णतेची लाट आणि वाढते आरोग्य संकट

राज्यात सध्या सूर्यनारायणाने आपला तीव्र कोप दाखवायला सुरुवात केली असून सर्वत्र प्रचंड उकाड्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, अनेक शहरांमध्ये तापमान चाळीस अंशांच्या पुढे गेले असून विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रासह संपूर्ण राज्य उष्णतेच्या लाटेने हैराण झाले आहे, मागील काही दिवसांपासून सातत्याने तापमानात वाढ होत असून मे महिन्याने तर उष्णतेचा उच्चांक गाठल्याचे स्पष्ट दिसून येत आहे, हवामान तज्ज्ञांनी यावर्षी उन्हाळा कडक राहणार असल्याचा दिलेला इशारा खरा ठरत असून एप्रिल महिन्यापासूनच उष्णतेची चाहूल लागली होती, त्या काळातच तापमानात वाढ झाली होती आणि आता मे महिन्यात ती तीव्र स्वरूप धारण करत आहे, विदर्भातील काही भागांमध्ये तापमान पंचेचाळीस अंशांच्या पुढे गेले असून तेथील नागरिकांना अक्षरशः होरपळ सहन करावी लागत आहे, कोरडे वारे, आर्द्रतेतील घट आणि सतत वाढणारे तापमान यामुळे उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र झाल्या आहेत, या परिस्थितीत उष्माघाताचे प्रमाण देखील वाढले असून राज्यात अनेक ठिकाणी उष्माघातामुळे रुग्ण आढळले आहेत आणि काही दुर्दैवी घटनांमध्ये जीवितहानीही झाली आहे, ही केवळ सरकारी नोंद असून प्रत्यक्षात अनेक रुग्ण ग्रामीण आणि शहरी भागात उपचाराविना किंवा अल्प उपचारात त्रास सहन करत आहेत, सरकारकडून नागरिकांना दुपारी घराबाहेर न पडण्याचा सल्ला देण्यात आला आहे, जो योग्य असला तरी दैनंदिन जीवनातील गरजा, रोजगार, शेतीकामे, लग्नकार्ये, धार्मिक कार्यक्रम, यात्रा आणि सामाजिक भेटीगाठी यामुळे नागरिकांना घराबाहेर पडणे अपरिहार्य ठरते, ग्रामीण भागात ग्रामदैवतांच्या यात्रा, कंदुरी, उत्सव आणि विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू असल्याने लोकांची मोठी गर्दी बाहेर दिसून येत आहे, त्यामुळे उष्णतेपासून बचाव करणे एक मोठे आव्हान बनले आहे, उन्हाळ्यात मानवी शरीरावर अनेक परिणाम दिसून येतात, थकवा, चक्कर येणे, डोकेदुखी, शरीरातील गोळे येणे, अशक्तपणा आणि उष्माघात यासारख्या समस्या वाढतात, काही व्यक्तींना त्वचेचे विकार तर काहींना डोळ्यांचे त्रास जाणवतात, दीर्घकाळ उन्हात राहिल्यास मेंदू, हृदय आणि श्वसनसंस्थेवरही विपरीत परिणाम होतो, विशेषतः मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग यांसारख्या आजारांनी ग्रस्त रुग्णांनी अधिक काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे, उष्माघात ही गंभीर स्थिती असून शरीराचे तापमान अनियंत्रितपणे वाढते आणि वेळेवर उपचार न मिळाल्यास जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, म्हणूनच उन्हाळ्यातील काळजी ही केवळ सल्ला नसून ती जीवनरक्षक गरज आहे, नागरिकांनी विशेषतः दुपारी बारा ते चार या वेळेत घराबाहेर जाणे टाळावे, बाहेर पडताना डोक्यावर टोपी, गॉगल, छत्री आणि पायात योग्य पादत्राणे वापरणे आवश्यक आहे, हलकी, सैल आणि सुती वस्त्रे परिधान करावीत जेणेकरून शरीराला उष्णतेचा त्रास कमी जाणवेल, सतत पाणी पिणे ही अत्यंत महत्त्वाची सवय ठेवावी कारण उष्णतेमुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन निर्जलीकरणाची स्थिती निर्माण होते, त्यामुळे दिवसाला किमान पुरेसे पाणी, नारळपाणी, फळांचे रस आणि घरगुती शीतपेयांचे सेवन करणे आवश्यक आहे, शेतकरी, कामगार आणि बाहेर काम करणाऱ्या व्यक्तींनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे कारण त्यांना थेट सूर्यप्रकाशात काम करावे लागते, वृद्ध व्यक्ती आणि लहान मुले यांच्यासाठी ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरू शकते, त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विशेष लक्ष ठेवणे आवश्यक आहे, उन्हाळ्यातील वाढते तापमान केवळ मानवी आरोग्यावरच नव्हे तर पशुधन, शेती आणि पाण्याच्या स्रोतांवरही परिणाम करत आहे, अनेक ठिकाणी पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होत असून जनजीवन विस्कळीत होत आहे, अशा परिस्थितीत शासन, सामाजिक संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे जनजागृती करून उष्णतेपासून बचावासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे, साध्या खबरदारीने आपण या तीव्र उष्णतेच्या संकटातून सुरक्षित राहू शकतो, त्यामुळे प्रत्येकाने जबाबदारीने वागून स्वतःचे आणि कुटुंबाचे आरोग्य जपणे हीच आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.


धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५


# डॉ. भानुदास जी. डेरे शाळेची दहावी बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी



कु. सुष्टी दिघे | कु. श्रुती सानप | कु. स्नेहा वाकळे | कु. स्नेहल मोरे | कु. प्रांजल गोडे

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर येथील नामांकित डॉ. भानुदास जी. डेरे इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा यावर्षीही कायम राखली आहे. फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (एस.एस.सी. बोर्ड) दहावीच्या परीक्षेत शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या या परीक्षेत शाळेतील विद्यार्थिनी कु. सृष्टि दत्तात्रय दिघे हिने व कु. श्रुति सुनिल सानप हिने ९६ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच, कु. स्नेहा जयराम वाकळे हिने व कु. स्नेहल सुहास मोरे हिने ९५.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. प्रांजल धोंडू गोडे हिने ९५ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांनी केवळ उत्तीर्णच नव्हे, तर उत्तम गुणांसह यश मिळवले आहे. यामध्ये ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणारे ११ विद्यार्थी आहेत. तसेच, ८० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केलेले २१ विद्यार्थी आणि ७० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणारे १४ विद्यार्थी तर ६० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणारे १५ विद्यार्थी आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. भानुदास डेरे, उपाध्यक्ष ड. श्रीराज भानुदास डेरे, सौ. अंकिता श्रीराज डेरे, शाळेचे प्राचार्य श्री. सुनीलकुमार शुक्ला, प्राथमिक विभागाच्या उपप्राचार्या सौ. हरजिंदरकौर बत्रा यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष कौतुक केले आहे. तसेच, विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षक व पालकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे सांगत, सर्व गुणवंतांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी संस्थेच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# रुपाली वाकचौरे यांच्या संकल्पनेतून अकोले मेडिकल फाउंडेशनच्या वतीने जागतिक परिचारिका दिन उत्साहात




अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)- अकोले मेडिकल फाउंडेशन यांच्या वतीने जागतिक परिचारिका दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी रुग्णसेवेत अहोरात्र कार्यरत असलेल्या परिचारिका व परिचारकांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी परिचारिकांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक करत, आरोग्य व्यवस्थेमध्ये त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात उत्कृष्ट सेवा देणाऱ्या परिचारिका व कर्मचारी यांचा मेडिकल फाउंडेशनच्या सचिव सौ. रूपाली वाकचौरे यांनी पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला व केक कापून साजरा करण्यात आला. तसेच, रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा असून परिचारिका या आरोग्य व्यवस्थेचा कणा आहेत, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले.

यावेळी अकोले मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रकाश वाकचौरे, डॉ. तुषार गावडे, डॉ. अद्वैत देशपांडे, कर्मचारी व परिचारिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते.

# भंडारदरा परिसरातील शेतकऱ्यांच्या पाण्याबाबतचे प्राथमिक सर्वेक्षण पूर्ण, ना. विखेंनी पुढाकार घ्यावा - डॉ. नवले



अकोले (युवार्ता प्रतिनिधी) भंडारदरा धरण परिसरातील शेतकऱ्यांना पिण्यासाठी तसेच शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागणीला आता गती मिळताना दिसत आहे. किसान सभेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर या संदर्भातील प्राथमिक सर्वेक्षण नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. आता पुढील प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया तातडीने पूर्ण होणे आवश्यक आहे. यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यामध्ये विशेष पुढाकार घेऊन भंडारदरा परिसरातील शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी किसान सभेच्यावतीने डॉ. अजित नवले यांनी केली आहे.

राजूर ते लोणी या किसान सभेच्या लाँग मार्चदरम्यान भंडारदरा परिसरातील पाणीप्रश्न हा प्रमुख मुद्दा म्हणून मांडण्यात आला होता. या मागणीची दखल घेत संबंधित विभागाकडून प्राथमिक स्तरावरील पाहणी व सर्वेक्षण प्रक्रिया पार पडली. या सर्वेक्षणानुसार भंडारदरा धरण परिसरात १२ बुडीत बंधारे उभारणे, तसेच भंडारदरा धरणाच्या भिंतीवर उंच टाकी उभारून सोलर पंपच्या माध्यमातून पाणी उचलण्याची योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

या टाकीत पाणी साठवून परिसरातील गावांना व शेतीला गुरुत्वाकर्षण पद्धतीने (ग्रॅव्हिटीने) पाणीपुरवठा करण्याची संकल्पना मांडण्यात आली आहे. या योजनेमुळे भंडारदरा परिसरातील अनेक गावांतील शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. पिण्याच्या पाण्यासोबतच शेतीसाठीही शाश्वत पाणी उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर-४१४००१**

पत्ता-सिंचन भवन, फकीरवाडा, अहिल्यानगर
ई-मेल: eeaidngmail.com दूरध्वनी क्रमांक : ०२४१-२३२४०१८

**ई-निविदा सूचना क्रमांक ०१ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत (जीएसटी वगळून) |
|---|---|---|
| १ | मुळा प्रकल्प मुळा डाव्या कालव्याचे सर्वेक्षण व अन्वेषण करुन प्रकल्प अहवाल तयार करणे | १०.४८ लक्ष |

**जिल्हा - अहिल्यानगर**
**ई - निविदा उपलब्ध कालावधी दि. १२/०५/२०२६ ते दि.१९/०५/२०२६ अखेर**
**ई - निविदा उघडणे - दि.२०/०५/२०२६ (शक्य झाल्यास)**

जा.क्र. अपावि/लेशा-२/२३१८ / सन २०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
अहिल्यानगर पाटबंधारे विभाग
अहिल्यानगर

(सही)
कार्यकारी अभियंता
अहिल्यानगर पाटबंधारे विभाग
अहिल्यानगर

जिमाका/नगर/जाहि/२२/२०२६


SUBSCRIBE YOUTUBE
Daily Yuvavarta

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME SREYARANI SAMARENDRA SETHI
TO NEW NAME AS SHREYA SAMARENDRA SETHI
BY AFFIDAVIT NO 507/2026
DATE 07/05/2026
ADD - MORAYA HIGHTS, WING A, FLAT NO - 8, MALDAD ROAD, SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR, MAHARASHTRA

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

त्वरित पाहिजेत
पेट्रोल पंप वर २ कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक उमेदवारांनी संपर्क करावा
पत्ता - चैतन्य पेट्रोलियम, संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी
8888808397

पाहिजेत
पुरुष रिसेप्शनिस्ट
अनुभवास प्राधान्य
बँकिंग व्यवहाराचे ज्ञान आवश्यक
संगणकाचे ज्ञान आवश्यक
स्वतःची दुचाकी व लायसन्स आवश्यक
8378956909

पाहिजेत
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

पाहिजेत
पसायदान चिल्ड्रन क्लिनिक अँण्ड नर्सिंग होम
ताजणे मळा, नविन नगर रोड, संगमनेर
डॉक्टर - BAMS / BHMS (सकाळ-१, रात्री -१)
नर्स - ANM / GNM (सकाळी -१, दुपारी-१, रात्री -२)
लॅब टेक्निशिअन (सकाळी -१, रात्री -१)
९९६०६१०६२३

ड्रायव्हर पाहिजे
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

गाळे भाडेतत्वावर देणे आहे
शोरुम, ऑफीस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे
ग्राऊंड फ्लोअर - १७०० स्क्वे. फुट
फर्स्ट फ्लोअर - १७०० स्क्वे. फुट
पत्ता - नाशिक-पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर
संपर्क - 7755965616, 9422737484

त्वरित पाहिजेत
ड्रायव्हर तसेच ऑफिस काम व साईट व्हिजिटसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
9421911671

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी







# संगमनेरमध्ये मुस्लिम समाजाचा सामुहिक विवाह सोहळा; १३ जोडपी निकाहबद्ध!




संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर शहराच्या इतिहासात रविवार, १० मे २०२६ हा दिवस सुवर्णअक्षरांनी लिहिला जाईल. शहरात ह्युमन रिलीफ अल्पसंख्याक फाउंडेशनच्या वतीने मुस्लिम समाजातील गोरगरीब कुटुंबांतील १३ मुला-मुलींचा सामूहिक निकाह सोहळा अत्यंत शाही थाटात पार पडला. वाढत्या महागाईच्या काळात, जिथे सर्वसामान्यांना मुलीचे लग्न करणे जड जात आहे, तिथे फाउंडेशनने एखाद्या पालकाप्रमाणे पुढाकार घेत या १३ लेकींचा निकाह लावून दिला. या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक जोडप्याला देण्यात आलेली भेट. मुस्लिम समाजाच्या परंपरेचा मान राखत फाउंडेशनने प्रत्येक जोडप्याला कुरान शरीफ, तस्बी, मुसंल्ला आणि नवरी मुलीला बुरखा प्रदान केला. त्यासोबतच, सुखी संसारासाठी आवश्यक असलेले कपाट, पलंग, मिक्सर आणि ७२ भांड्यांचा संच भेट म्हणून दिला. प्रत्येक नवरी मुलीला ११०० रुपये रोख देऊन तिचे स्वागत करण्यात आले.

ज्ञानमाता विद्यालयाच्या भव्य प्रांगणात पार पडलेल्या या सोहळ्यात ७ हजारहून अधिक नागरिकांनी हजेरी लावली. उन्हाळ्याचा विचार करून संपूर्ण मंडपात ६० मोठे कुलर लावले होते, ज्यामुळे उपस्थितांना उन्हाची झळ बसली नाही. नवरी मुलगी आणि नवरदेवासाठी स्वतंत्र आणि सुसज्ज स्टेजची व्यवस्था करण्यात आली होती. आलेल्या पाहुण्यांसाठी भव्य जेवणाची पंगत आणि थंड पाण्याचे जार उपलब्ध होते.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित होते. आमदार सत्यजित दादा तांबे म्हणाले, मुस्लिम समाजात सामूहिक विवाहाची ही संकल्पना राबवून फाउंडेशनने समाजाला मोठी दिशा दिली आहे. महागाईच्या काळात हा एक फार मोठा दिलासा आहे. मुस्लिम समाजाचे नावे तर सर्वच जाती धर्मातील लोकांनी या विवाह सोहळ्याचा आदर्श घ्यावा. उद्योजक गिरीशजी मालपाणी म्हणाले, इतक्या मोठ्या स्तरावर सर्व सोयींनी युक्त निकाह सोहळा आयोजित करणे ही कौतुकास्पद बाब आहे. यातून सामाजिक एकोपा अधिक घट्ट होतो. शिवसेना नेत्या शुभांगीताई पाटील म्हणाल्या, जेव्हा एखादी संस्था मुलीच्या बापाची जबाबदारी स्वीकारते, तेव्हा तो सोहळा ऐतिहासिक ठरतो. फाउंडेशनने आज १३ लेकींचे घर वसून मोलाचे कार्य केले आहे. नक्कीच ह्यूमन रेडीप्टर संख्या फाउंडेशनचा हा सामाजिक उपक्रम महाराष्ट्राला आदर्श घेण्याजोगा ठरेल.

सोहळ्यात पारदर्शकता राखण्यासाठी प्रत्येक जोडप्याचे आधार कार्ड, शाळेचा दाखला आणि जन्मतारखेची रीतसर तपासणी करण्यात आली होती. पोलीस प्रशासन आणि संगमनेर नगरपालिकेने पाणीपुरवठा व स्वच्छतेसाठी मोलाचे सहकार्य केले. या निकाह सोहळ्याला माजी मंत्री ना. बाळासाहेब थोरात, पदवीधर आमदार सत्यजित दादा तांबे, गिरीशजी मालपाणी, शुभांगी ताई पाटील, यांच्यासह शहर व जिल्ह्यातील राजकीय, अराजकीय, सामाजिक संस्था-संघटनेचे प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह्युमन रिलीफ अल्पसंख्याक फाउंडेशनच्या या ऐतिहासिक उपक्रमाचे संपूर्ण जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून प्रा. नारायण खेमनर यांना पीएच.डी. प्रदान



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
अहिल्यानगर/संगमनेर: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी एक्सपेरिमेंटल इन्व्हेस्टिगेशन इंटू डिसिमिलर मेटल लॅप जॉइनिंग यूजिंग फ्रिक्शन स्टिर स्क्राईब टेक्निक या विषयावर संशोधन पूर्ण केल्याबद्दल डॉ. प्रा. नारायण सहादू खेमनर यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली. हे संशोधन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अहिल्यानगर येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील संशोधन केंद्रात करण्यात आले असून, या संशोधनासाठी त्यांना डॉ. विजय गडाख यांचे मार्गदर्शन लाभले.


डॉ. प्रा. नारायण खेमनर हे संगमनेर तालुक्यातील अंभोरे गावचे माजी सरपंच सहादू खेमनर यांचे सुपुत्र असून, ते सध्या सहाय्यक प्राध्यापक म्हणून अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, संगमनेर येथे कार्यरत आहेत. त्यांच्या संशोधनामुळे ऑटोमोबाईल उद्योगामध्ये धातूंच्या जोडणीच्या आधुनिक तंत्रज्ञानाला चालना मिळून वाहनांचे वजन कमी करण्यास तसेच मायलेज वाढविण्यास मोठी मदत होणार आहे.

या संशोधनाच्या माध्यमातून त्यांनी २ एससीआय दर्जाचे जर्नल पेपर्स, २ आंतरराष्ट्रीय परिषदेतील संशोधन पेपर्स सादर केली आहेत. त्यांच्या या यशाबद्दल बाळासाहेब भाऊसाहेब थोरात (अध्यक्ष, अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था व माजी महसूल मंत्री, महाराष्ट्र शासन), मा. आ. सुधीरजी तांबे, मा. आ. सत्यजित तांबे, मा. रणजितसिंह देशमुख, चेअरमन, राजहंस दूध संघ, विश्वस्त शरयूताई देशमुख, ए. बी. शिंदे (मुख्य कार्यकारी अधिकारी), अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था, प्रा. व्ही. बी. धुमाळ, मॅनेजर, डॉ. प्रा. जे. बी. गुरव (संचालक, अकॅडेमिक्स), तसेच प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश, अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, प्रा. व्ही. पी. वाघे, रजिस्ट्रार, तसेच डॉ. प्रा. आर. आर. नवथर (प्राचार्य, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अहिल्यानगर), डॉ. प्रा. एस. एम. मगर (विभागप्रमुख), डॉ. प्रा. के. एम. मरकड (समन्वयक) व त्यांचे सर्व मित्र परिवार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

पीएच.डी. पदवी मिळाल्यामुळे खेमनर यांच्या शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील योगदानाची दखल घेतली जात असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित दहा सदस्यांचा १४ मे रोजी शपथविधी

## सभापती राम शिंदे देणार सदस्यत्वाची शपथ



मुंबई (प्रतिनिधी)-
महाराष्ट्र विधानपरिषदेवर विधानसभा सदस्यांद्वारे द्विवार्षिक निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेले नऊ सन्माननीय सदस्य आणि पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या एक सन्माननीय सदस्या, अशा दहा नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांचा शपथविधी गुरुवार, दिनांक १४ मे २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे होणार आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेचे माननीय सभापती प्रा. राम शिंदे हे या दहा सदस्यांना सदस्यत्वाची शपथ देतील.

डॉ. नीलमताई गोऱ्हे, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू, अंबादास एकनाथराव दानवे, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, प्रमोद शांताराम जठार, झीशन झिआउद्दीन सिध्दीकी, माधवी संजय नाईक, सुनिल विनायक कर्जतकर, विवेक बिपिनदादा कोल्हे आणि संजय नथ्थुजी भेंडे या नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांना सभापती महोदय शपथ देतील.

या शपथविधी समारंभास विधानसभेचे अध्यक्ष माननीय ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांना निमंत्रित करण्यात आले असून, या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असेल. विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांनाही शपथविधी समारंभासाठी निमंत्रित करण्यात आले आहे.

विधानपरिषदेच्या विद्यमान उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे सलग पाचव्यांदा सदस्यत्वाची शपथ घेतील.

# जिल्ह्यात उष्मालाटेचा 'यलो अलर्ट'

## उष्माघातापासून बचावासाठी जिल्हा प्रशासनाचे आवाहन



अहिल्यानगर
(जिल्हा माहिती कार्यालय)-
भारतीय हवामान खात्याद्वारे निर्गमित संदेशानुसार, १२ ते १४ मे २०२६ दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाटेची शक्यता वर्तविण्यात आलेली असून, यलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानव व पशू-प्राणी यांच्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

प्रशासनाने नागरिकांना दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तहान लागली नसेल तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस. घ्यावे. तसेच, घरी तयार करण्यात आलेली लस्सी, ताक, कैरीचे पन्हे, लिंबूपाणी इत्यादींचा नियमित वापर करावा. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करावा. तसेच, ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. उन्हापासून बचाव करण्यासाठी हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा आणि रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे, ओले कपडे यांचा वापर करावा व थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे. अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम ही उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखून, चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडिओ, टी.व्ही. किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करावा.

दुपारी १२.०० ते ०३.०० वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. उन्हात अतिकष्टाची कामे करू नयेत. बाहेर तापमान जास्त असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत. गडद, घट्ट व जाड कपडे घालणे टाळावे. दारू, चहा, कॉफी व कार्बोनेटेड थंड पेये घेऊ नयेत. उच्च प्रथिनयुक्त आहार आणि शिळे अन्न खाऊ नये. उन्हाच्या कालावधीत शक्यतो स्वयंपाक करणे टाळावे व मोकळ्या हवेसाठी स्वयंपाकघराची दारे आणि खिडक्या उघड्या ठेवाव्यात.

उष्माघाताची लक्षणे दिसताच सर्व नागरिकांनी तात्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा. मदतीसाठी व आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांनी १०७७, १०२, १०४, १०८ व ११२ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# श्री बाळेश्वर विद्यालयाचा दहावीत उज्ज्वल निकाल, स्वप्नाली चौधरी प्रथम



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री बाळेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, सारोळे पठार, तालुका संगमनेर, या विद्यालयाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून, विद्यालयाचा एकूण निकाल ९७.५०% लागला आहे.

या परीक्षेसाठी विद्यालयातून एकूण ४० विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्यापैकी ३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये विशेष प्राविण्य मिळविणारे विद्यार्थी ११, प्रथम श्रेणी मिळविणारे १६, तर द्वितीय श्रेणी मिळविणारे ९ आहेत.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कुमारी स्वप्नाली सुरेश चौधरी हिने ९४.४०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक कुमारी आकांक्षा सचिन मराठे हिने ८३.६०% गुण मिळविले. तृतीय क्रमांक कुमारी वैष्णवी वीरेंद्र किनीकर हिने ८३.४०% गुण मिळविले. चतुर्थ क्रमांक कुमारी मनीषा हेमराज गवळी हिने ८३.२०% गुण मिळविले. पंचम क्रमांक दोन विद्यार्थिनींनी मिळविला असून, योगेश्वरी प्रकाश फटांगरे हिने ८०.६०% व ईश्वरी वसंत फटांगरे हिने ८०.६०% गुण प्राप्त केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य उत्तम खांडवी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त चंद्रराव मोरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी...

पा नं. ०३ वरुन-
काटेकोर पालन व्हावे. तसेच ऑनलाइन कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या अवास्तव सवलतींमुळे स्थानिक दुकानदारांचे अस्तित्व धोक्यात आले आहे, त्यावर नियंत्रण आणावे, या प्रमुख मागण्या आहेत.

ऑनलाइन औषध विक्रीमुळे बनावट औषधे बाजारात येऊ शकतात. बंदी असलेली औषधे, गर्भपात औषधे नशेसाठी वापरण्यात येतात, अशी औषधे ऑनलाइन विक्रीमुळे सहजरीत्या उपलब्ध होत आहेत. ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स ॲण्ड ड्रगिस्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे, सचिव राजीव सिंघल, महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव अनिल नावंदर यांनी संपात सहभागी होण्याचे आवाहन केले असून, या संपात जिल्ह्यातील सर्वच औषध विक्रेते सहभागी होणार आहेत.

# छत्रपती संभाजी महाराज: अद्वितीय शौर्याचा तेजस्वी अध्याय



(१४ मे १६५७-११ मार्च १६८९)
छत्रपती शिवाजी महाराजांनंतर मराठयांच्या गादीवर आलेले हे दुसरे छत्रपती. हौतात्म्यामुळे अजरामर झालेले एक पराक्रमी पुरूष. त्यांचा जन्म छ. शिवाजी महाराज व सईबाई यांच्या पोटी पुरंदर किल्ल्यावर (पुणे जिल्हा) झाला. त्यांना तीन वडीलबहिणी होत्या. सईबाईंच्या अकाली मृत्यूनंतर (१६५९) त्यांचा सांभाळ आणि शिक्षण आजी जिजाबाईंनी केले. सभासद व चिटणीसांच्या बखरींतून याविषयी तपशील आढळतात. केशवभट आणि उमाजी पंडित यांनी त्यांना उत्तम शिक्षण दिले. केशवभटांनी त्यांना दंडनीती व प्रयोगरूप रामायण ऐकविले. शिवाय राजपुत्रास आवश्यक असे घोडयावर बसणे, शस्त्रविदया, तालीम, तिरंदाजी वगैरेंचे शिक्षण दिले.

छ. संभाजींच्या दानपत्रावरून (२७ ऑगस्ट १६८०) त्यांच्या संस्कृत ज्ञानाविषयी माहिती मिळते. त्यांनी स्वतः लिहून घेतलेल्या तीन भागांतील बुधभूषण या ग्रंथात काव्यालंकार, शास्त्रे, संगीत, पुराणे, धनुर्विद्या यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे. यात राजा आणि त्याचे गुण, राजाचे मदतनीस, राजाचे सल्लागार, राजाची कर्तव्ये, राजसभा, मुख्य प्रधान, राजपुत्र, त्यांचे शिक्षण, त्यांची कर्तव्ये, कोश, दुर्ग, सैन्य, हेर, नोकर वगैरेंची माहिती दिली आहे. याशिवाय गागाभट्टांकडून नीतिपर समयनय हा ग्रंथ (पोथी) त्यांनी लिहून घेतला (१६८१) आणि धर्मकल्पलता हा धर्मशास्त्रावरील ग्रंथ केशव पंडिताने संभाजीराजांसाठी लिहिला (१६८२). युद्धकलेतील नैपुण्याबद्दल अबे कॅरे या परकीय लेखकाने संभाजींची प्रशंसा केली आहे.

संभाजीराजांचा विवाह पिलाजीराजे शिर्के यांची कन्या राजसबाईबरोबर झाला (१६६५). तिचे नाव येसूबाई ठेवण्यात आले. येसूबाईपासून कन्या भवानीबाई (१६७८) आणि पुत्र शिवाजी (१६८२ - छत्रपती शाहू) ही दोन अपत्ये संभाजीराजांना झाली. चंपा ही त्यांची दुसरी राजपूत पत्नी. तिला माधोसिंग व उधोसिंग हे दोन मुलगे झाले. दुर्गाबाई ही आणखी एक पत्नी असल्याचा उल्लेख उत्तरकालीन कागदपत्रांत येतो.

मे १६६६ मध्ये ते छ. शिवाजी महाराजांबरोबर आग्र्यास गेले होते. आग्र्याहून छ. शिवाजी महाराज संभाजीराजांसह बाहेर पडले, पण वाटेत त्यांनी संभाजीराजांना मथुरेत ठेवले होते. पुढे ते २० नोव्हेंबर १६६६ रोजी राजगडास पोहोचले. संभाजीराजे मोगलांची मनसबदारी स्वीकारण्यासाठी १६६७ च्या उत्तरार्धात औरंगाबादला गेले व परतले (५ नोव्हेंबर १६६७). त्यांना इ.स. १६७१-७४ दरम्यान राज्यकारभाराचा अनुभव यावा म्हणून महाराजांनी महादजी यमाजी हा वाकेनिवीस दिला. १६७२ पासून त्यांनी प्रत्यक्ष लढाईत भाग घेतल्याचा उल्लेख आढळतो. छ. शिवाजी महाराजांनी कर्नाटकच्या स्वारीवर जाताना (नोव्हेंबर १६७६) संभाजीराजांना शृंगारपूरला राहण्याची अनुज्ञा दिली. तिथे त्यांनी कलीची उपासना केली आणि नंतर कलशाभिषेक करून घेतला (२३ मार्च १६७८). त्यानंतर महाराजांनी त्यांना सज्जनगडावर जाण्याचा आदेश दिला (नोव्हेंबर १६७८). तिथून संभाजीराजे १३ डिसेंबर १६७८ रोजी मोगलाईत दिलेरखानाकडे गेले. दिलेरखानाने मराठी मुलखात आक्रमण सुरू केले. दोघांनी काही गड घेतले. पुढे मतभेद होऊन संभाजीराजे गुप्तपणे स्वराज्यात पन्हाळ्यास आले (२१ डिसेंबर १६७९).

छ. शिवाजी महाराजांच्या मृत्यूच्या वेळी (३ एप्रिल १६८०) राजे पन्हाळ्यावर होते. त्यानंतर सोयराबाई आणि काही कारभाऱ्यांनी राजारामांचा राज्याभिषेक केला. संभाजीराजे मात्र नंतर पन्हाळ्यावर जाऊन समर्थकांसह पुढे सरसावले. त्यांनी विरोधकांना कैद केले. १८ जून १६८० रोजी ते रायगडास पोहोचले आणि जुलैमध्ये मंचकारोहण केले. १६ जानेवारी १६८१ रोजी त्यांनी विधिवत राज्याभिषेक करून घेतला.

राज्याभिषेकानंतर त्यांनी विरोधकांवर कठोर कारवाई केली. अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, सोमाजी दत्तो, हिरोजी फर्जंद यांना ठार मारले. कवी कलश यास त्यांनी महत्त्वाचे पद दिले. तो त्यांच्या राज्यकारभारात प्रभावी ठरला. या काळात राज्यातील अंतर्गत बंडखोरी मोडून काढण्यात आली. संभाजीराजांच्या कारकिर्दीत सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज, वाडीकर सावंत, दळवी यांच्याशी संघर्ष झाला. तसेच औरंगजेबाशी प्रचंड संघर्ष झाला. अकबराने बंड करून संभाजीराजांचा आश्रय घेतला, पण त्याचा उपयोग झाला नाही. जंजिऱ्याविरुद्ध मोहीम, आरमार उभारणी, उंदेरी-चौल मोहिमा यांत त्यांनी सक्रिय भाग घेतला. समुद्रातील लढायांमुळे मराठ्यांचे नौदल मजबूत झाले.

पोर्तुगीजांशी संघर्ष, चौल-फोंडा युद्धे, आणि मोगलांविरुद्ध सतत लढाया सुरू राहिल्या. औरंगजेबाने दक्षिणेत आक्रमण करून आदिलशाही व कुत्बशाही संपवली आणि मराठ्यांवर लक्ष केंद्रित केले. संभाजीराजांनी या आक्रमणाचा तीव्र प्रतिकार केला. विविध ठिकाणी मोगल फौजांचा पराभव केला. मात्र काही सरदारांच्या फितुरीमुळे आणि गुप्त माहितीमुळे संभाजीराजे संगमेश्वर येथे पकडले गेले. त्यानंतर त्यांना औरंगजेबाने क्रूरपणे ठार मारले. त्यांचा मृत्यू मराठा इतिहासातील अत्यंत शोकांतिका ठरली.

संभाजीराजांनी अष्टप्रधान पद्धती कायम ठेवली. महसूल, सैन्य, किल्ले, आरमार यांची व्यवस्था उत्तम राखली. दुष्काळात पुनर्वसन केले, शेतकऱ्यांना कौलनामे दिले. धार्मिक दृष्टिकोनातून त्यांनी देवस्थानांना मदत केली, मठांना अनुदाने दिली आणि संतपरंपरेचा आदर राखला. रामदासी मठ, वारकरी परंपरा, वेदशास्त्र पंडित यांना त्यांनी संरक्षण दिले. त्यांच्या कारकिर्दीत धैर्य, शौर्य आणि कठोर निर्णयक्षमता दिसते. अनेक आघाड्यांवर ते स्वतः उपस्थित राहून नेतृत्व करत होते. परंतु सततच्या युद्धांमुळे आणि राजकीय परिस्थितीमुळे त्यांना अखेरपर्यंत संघर्ष करावा लागला.

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०






# गौण खनिजांची ठेकेदाराने केली परस्पर विक्री, दराडे यांचा आरोप




युवावार्ता (प्रतिनिधी)-
संगमनेर - तालुक्यातील पिंपळदरावाडी येथील साठवण तलाव कामाचे खोदकाम गेल्या एक वर्षापासून सुरू होते. खोदकामात निघालेले दगड, मुरूम ही सर्व गौणखनिज नियमाप्रमाणे साठा करणे बंधनकारक होते. परंतु संबंधित ठेकेदाराने गौणखनिज उत्खनन केल्यानंतर त्याची परस्पर विक्री केल्याचा आरोप माजी जिल्हा परिषद सदस्य बाजीराव दराडे यांनी केला आहे.

याबाबत आरोप करताना दराडे म्हणाले, जलसंधारण विभागाच्या निविदेमध्ये २५,००० ते ३०,००० एवढे उत्खनन अंदाजपत्रकाप्रमाणे दिसून येते. यामध्ये उत्खनन सुरू झाल्यानंतर संबंधित ठेकेदाराने नियमाप्रमाणे जलसंधारण विभागाच्या परवानगीने महसूल विभागाला कळविणे अपेक्षित होते व परवानगी घेऊन याठिकाणी एवढे मोठे उत्खनन होणार आहे. सदरचा गौणखनिज साठवण्यासाठी किंवा महसूल विभागाच्या आदेशाने पुढील कार्यवाही होणे अपेक्षित होते, परंतु तसे झालेले नाही. सदरचे गौणखनिज हे परस्पर कुठल्याही परवानग्या न घेता विक्री करण्यात आले आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. महसूल विभागाचे दीड कोटी ते अडीच कोटी रुपयांपर्यंतचा बाजारभावाप्रमाणे शासकीय मूल्य व स्वामित्व धन याची एकूण किंमत व नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी महसूल विभाग दंड करणार का? असा सवाल उपस्थित केला आहे.

सदर साठवण तलावाच्या कामात मोठा अपहार घडल्याची शक्यता आहे. मात्र, कोणाच्या वरदहस्ताने हा प्रकार सुरू होता याचा शोध लागणे गरजेचे आहे. परंतु संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करून शासनाचे होणारे नुकसान महसूल विभाग

वसूल करणार का? वसुली प्रस्तावित होताना फौजदारी गुन्हा नोंद करून पुढील तपास पारदर्शी होणार का? असे प्रश्न उपस्थित करुन राजकीय वरदहस्त प्रशासनावर दबाव आणून प्रकरण शांत करण्याचे प्रयत्न करेल म्हणून चौकशी जलदगती करावी याबाबतचे निवेदन राज्याचे गृह, महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांना बाजीराव दराडे यांनी दिले आहे. त्यावर मंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना या प्रकरणाची तातडीने चौकशी करून तसा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# चिंचपूर-दुर्गापूर शिवारात भरदिवसा घरफोडी

## महिलेला मारहाण करून १० हजारांची रोकड लंपास





युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - तालुक्यातील चिंचपूर-दुर्गापूर शिवारात मंगळवारी (१२ मे) दुपारी ४ वाजेच्या सुमारास चोरीची एक थरारक घटना घडली आहे. अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून एका महिलेला मारहाण करत कपाटातील १० हजार रुपयांची रोकड चोरून नेली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे.

शिर्डी विधानसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या चिंचपूर-दुर्गापूर शिवारात रवींद्र संपत थेटे यांच्या वस्तीशेजारी गणपत देवराम पारधे यांचे निवासस्थान आहे. मंगळवारी दुपारी पारधे कुटुंबातील बहुतांश सदस्य काही कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. घरात केवळ त्यांची लहान सून आणि एक छोटे बाळ होते. हीच संधी साधून दोन पुरुष आणि दोन महिला अशा एकूण चार चोरट्यांनी घरात प्रवेश केला. या चोरट्यांनी घरातील सुनेला मारहाण केली आणि तिला जीवे मारण्याची धमकी देऊन दहशत निर्माण केली. त्यानंतर घराची उचकापाचक करून कपाटात ठेवलेले १० हजार रुपये रोख लंपास केले. चोरट्यांनी आपली दुचाकी घरापासून काही अंतरावर लांब उभी केली होती. चोरी केल्यानंतर सर्व आरोपी दुर्गापूर गावाच्या दिशेने पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच शिर्डी विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यांच्यासोबत लोणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आठरे आणि आश्वी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिरसाठ हे आपल्या पथकासह दाखल झाले. घटनेचे गांभीर्य ओळखून तपासासाठी तातडीने श्वान पथकाला पाचारण करण्यात आले आहे. प्राथमिक तपासात १० हजार रुपये चोरीला गेल्याची माहिती समोर आली असली तरी, पोलीस अधिक सखोल चौकशी करत आहेत. भरदिवसा झालेल्या या चोरीच्या आणि मारहाणीच्या घटनेमुळे चिंचपूर-दुर्गापूर परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत. चोरट्यांमध्ये महिलांचाही समावेश असल्याने ही टोळी नेमकी कुठली आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत. याप्रकरणी लोणी आणि आश्वी पोलीस संयुक्तपणे तपास करत असून लवकरच आरोपींना जेरबंद केले जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# राहुरीत बोगस डॉक्टरवर गुन्हा

युवावार्ता (प्रतिनिधी)
अहिल्यानगर - राहुरी शहरातील गॅलक्सी निसर्गोपचार केंद्र चालवणाऱ्या तन्वीर हारुन देशमुख याच्याविरोधात बोगस वैद्यकीय व्यवसाय केल्याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ तसेच भारतीय न्याय संहितेतील विविध कलमान्वये ही कारवाई करण्यात आली असून, बनावट पदवी प्रमाणपत्रांचा वापर करून रुग्णांवर उपचार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याबाबत ग्रामिण रुग्णालय राहुरीचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. गणेश बाबासाहेब मिसाळ यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. डॉ. मिसाळ हे सध्या वैद्यकीय अधीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. फिर्यादीनुसार, डिसेंबर २०२२ मध्ये महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिनकडून राहुरीतील कथित बोगस डॉक्टर तन्वीर देशमुख याच्याविरोधात चौकशीचे आदेश प्राप्त झाले होते. त्यानंतर २३ फेब्रुवारी २०२३ रोजी ग्रामिण रुग्णालय व तालुका आरोग्य विभागाच्या पथकाने राहुरी शहरातील नगर-मनमाड महामार्गालगत असलेल्या गॅलक्सी निसर्गोपचार केंद्रावर भेट दिली होती.

या तपासणीदरम्यान तन्वीर देशमुख याने स्वतःकडे विविध वैद्यकीय पदवी व नोंदणी प्रमाणपत्रे असल्याचे दाखविले होते. त्यामध्ये 'इंडियन मेडिकल बोर्ड - नॅचरोपॅथिक सिस्टम' कानपूर, उत्तर प्रदेश या संस्थेची बीएएमएस (नॅट) पदवी, विविध नोंदणी प्रमाणपत्रे तसेच नॅचरोपॅथी व योग विषयातील डिप्लोमा प्रमाणपत्रांचा समावेश होता. मात्र, संबंधित प्रमाणपत्रांची विविध शासकीय व वैद्यकीय संस्थांकडून फेरतपासणी करण्यात आल्यानंतर धक्कादायक बाबी समोर आल्या.






















दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25